ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# वारली आदिवासी जमातीचा कामडनाच



कु.मनाली सांगोलकर
**डॉ.तुकाराम नारायण शिंदे**
एम.ए.सेट, पीएच.डी.
इतिहास विभाग प्रमुख
ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

**गोषवारा :**

भारत हा देश विविध धर्मीयांचा, जातींचा, संस्कृतीचा देश असून अनेक, जाती-जमातींचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत.

भारतीय समाज हा संमिश्र स्वरूपाचा आहे.भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क कलम १५ मध्ये असे म्हटले आहे की, धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई आहे. या विविधतेतून भारतीय समाजाचा उदय झालेला आहे. आदिवासी समाज हा भारतीय संस्कृतीचा मूळ प्रवाह असून भारतीय संस्कृती आदिवासी संस्कृतीपासून निर्माण झालेली आहे.

महाराष्ट्रात एकूण आदिवासी विभागाचे तीन विभाग पडतात. i) सह्याद्री ii) सातपुडा iii) विदर्भ / गोंडवना या विभागात महाराष्ट्रातील एकूण ४७ जमाती अस्तित्वात आहेत.

आदिवासी जमाती प्रामुख्याने डोंगराळ आणि जंगलात राहतात. त्यामुळे त्यांचा शहरी भागाशी कमी संबंध येतो. आदिवासी जमातींच्या जीवनात चालीरीती, रूढी, परंपरा, जीवन पद्धती, नृत्य प्रकार, देवदेवता ही वैशिष्ट्ये आढळून येतात. आदिवासी जमातीत सण, उत्सव, पावसाळ्यात पेरणीनंतर व कापणी केल्यानंतर साजरे केले जातात. या संस्कृतीत होळी, दसरा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नागपंचमी, गौरीनाच, कामडनाच, नारनदेवाची पूजा यांसारखे सण-उत्सव अत्यंत उत्साहात व मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. आदिवासी संस्कृती ही भारतीय समाजाचा अविभाज्य भाग आहे.

## आदिवासी शुद्राचा अर्थ व व्याख्या :

आदिवासी समाज म्हणजे, आदिम समाज म्हणून ओळखला जातो.'आदिम अगर आदिवासी' (Primitive Primes) असे नामाभिधान हटनने केले आहे.डॉ.घुर्ये यांनी त्यांना 'तथा कथित मूळचे रहिवासी' (So-called Aborigines) व मागासलेले हिंदू (Back Ward Hindus) असे म्हटलेले आहे.भारतीय राज्यघटनेत आदिवासी जमातीला अनुसूचित जमात / जमाती (Schedule Tribes) असा उल्लेख केलेला दिसून येतो.

## आदिवासी व्याख्या :

१) डब्ल्यू. जे. पेरी : यांनी आदिवासी समाजाची कमीतकमी वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. ते म्हणतात,"समान बोलीभाषा बोलणाऱ्या बातकाच समान भू-प्रदेशावर, वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिम समाज किंवा आदिवासी समाज असे म्हणतात."
२) डॉ.रिव्हर्स म्हणतात, "ज्या समूहातील सदरचे एक समान बोलीभाषा बोलतात, युद्ध वगैरेसारख्या उद्दिष्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात असा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात."
३) इंपिरियल गॅझेटमध्ये आदिवासींची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. "समान बोलीभाषा बोलणाऱ्या एकाच भू-भागात राहणाऱ्या, सुरूवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाह नसलेल्या व समान नावेधारण करणाऱ्या कुटूंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.[१]
४) मदन व मजुमदार यांच्या मते, "समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टिने परस्परसंबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून नेहमी केला जातो.
५) बोगार्डस् म्हणतात, "सुरक्षिततेची जरूरी, रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला होता."[२]

## संस्कृती (Culture) अर्थ व व्याख्या :

सामाजिक शास्त्रात 'संस्कृती ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण जगातील प्रत्येक मानवी समूहाला स्वत:ची अशी विशिष्ट संस्कृती असल्याचे दिसून येते. संस्कृती म्हणजे मानवाची जगण्याची पद्धत किंवा वर्तन हे इतरांपेक्षा वेगळे आहे हे दर्शविण्याची पद्धत म्हणजे संस्कृती होय.'

## संस्कृतीच्या व्याख्या :

### १) एडवर्ड टायलर (E.B.Tylor) :

'समाजाचा घटक म्हणून व्यक्ती ज्ञान, श्रद्धा, कला, नीती, कायदा, रूढी या व अशाच तत्सम क्षमता आणि सवयी प्राप्त करून घेते. या सर्वांच्या मिश्रणाला संस्कृती असे म्हणतात. (Culture is Complex whole which includes knowledge, belief, art, morals, law, custom and any other capabilities and habits, acquired by man as a member of society.)

### २) गोल्ड वाइजर (Golden weiser) :

'संस्कृती अंतर्गत आपल्या धारणा, विश्वास विचार, आमचे निर्णय व मूल्य, आमच्या संस्था राजकीय व स्थानिक, धार्मिक तसेच आर्थिक, आमचे शिष्टाचार, पुस्तके व यंत्र, आमचे विज्ञान, तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञानी, सर्व वस्तू आणि प्राणी दोन्हीही स्वत: अनेक अंतर संबंधांतर्गत संमलित आहेत. (Culture includes our attitudes, beliefs and ideas, our judgment and values; our institution, political and legal, religious and economic, our ethical codes of etiquette, our books and machines, our sciences, philosophies and philosophers all of these things and beings both in themselves and in their multiform interrelations.')[३]

## आदिवासी जमातींचा धर्म, अर्थ व व्याख्या :

धर्म या अक्षराची उत्पत्ती 'धृ' या धातुपासून झाली असून त्याचा अर्थ धारण करणे असा आहे.समाजात ज्या काही घटना घडतात त्याचा करता – करविता कोणीतरी दुसरा आहे.असा समज दृढमूल झाला व त्यातूनच धर्मही संकल्पना उदयास आली.

**व्याख्या :**

**१) मेलफोर्ड :**

धर्म ही कल्पना ईश्वरस्वरूप मानवी जीवनाच्या युद्धांवर आधारलेली असते.त्यांची मानवी जीवनाला सहाय्य करण्याची किंवा हानी पोहोचवण्याची क्षमता असते. (Religion biased in super human beings and in their power to assist to harm man.)

**२) कार्ल मार्क्स :**

'धर्म हे शोषितांची तयार केलेले एक साधन असून ही हृदयहीन शब्दांची भावना होय. तसेच आत्महीन अवस्थेचा आला होय. तसेच आत्महीन अवस्थेचा आत्मा होय. लोकांच्या दृष्टिने धर्म ही अफूची गोळी असते.' (Religion is a sign of the appered creature the sentiments of a heartless word and the soul of soulless conditions it is the opiem of the people.)[४]

**वारली अदिवासी जमातीचा सण-उत्सव व (कामडनाच) :**

महाराष्ट्रात वारली आदिवासी जमात प्रामुख्याने जव्हार-मोखाडा येथे मोठ्या प्रमाणात आढळून येते.'वारली' शब्द 'वारल' या शब्दावरून तयार झालेला आहे.वारल म्हणजे जमीन असणारे असा याचा अर्थ होतो.

आदिवासी समाज हा सर्वसाधारणपणे निसर्गाच्या चिरसान्निध्यात राहत असल्यामुळे त्यांचा संबंध निसर्गाशी येत असतो. आदिवासी जमातीत सण-उत्सव, नृत्याला सुरूवात शेतीतील पिकाच्या पेरणीनंतर व कापणीनंतर अर्थात पावसाळा संपत येण्याच्या वेळेस ते आपले सण-उत्सव साजरे करण्यास सुरूवात करतात. आदिवासी समूह हा आपल्या मनोरंजनासाठी अनेक सण-उत्सव साजरे करीत असतो. जसे नागपंचमी, रक्षाबंधन, होळी, शिमगा, दसरा, गौरीपूजा (गौरीनाच, नारनदेवाची पूजा) कामडनाच वाघदेव, हिरवादेव या देवतांची पूजाविधी करून उत्साहात सण साजरे केले जातात.

आदिवासी जमातीचे लोकविधी सण-उत्सव साजरे करतात. इतरांच्या सण-उत्सवासारखे साम्य आढळत असले, तरीही सण-उत्सव साजरे करण्याची प्रथा, परंपरा, पद्धती ही भिन्न स्वरूपाचा आहे.

- **नारनदेवाची पूजा :** वारली आदिवासी जमातीत केला जाणारा कामडनाच ठाकर, महादेव कोळी या जमातीत ही केला जातो.

  'नारनदेव' हा वारली आदिवासी जमातींचा मोठा देव असून पाऊस पडण्यासाठी या देवाची पूजा करतात. या देवाला 'पर्जन्य देवता' मानतात.[६] नारनदेवाला, टोपलीत ठेऊन तसेच टोपलीत तांदूळ घेऊन त्याला शेंदूर लावून त्याची पूजा केली जाते. पूजेच्या वेळी मध्यभागी पाटावर देव ठेवून त्याच्यापुढे दिवा लावून ठेवतात किंवा भाताची रास करून त्याच्यावर देव ठेवतात व जवळच दिवा लावून त्यांच्याभोवती पुरूष पायात घुंगरू बांधून नाचतात व गाणी म्हणतात.

  आदिवासींच्या जीवनात नृत्याला जेस्थान आहे ते इतर कोणत्याही समाजात नसेल त्याची नृत्ये ही सामुदायिक असतात.

- **डॉ.गोविंद गारे :** आदिवासी नृत्याच्या संदर्भात ते 'आदिवासी कला' या ग्रंथात म्हणतात की, ''काही नृत्याचा उगम धार्मिकतेतून झाला आहे. आदिम मानवाची अशी धारणा होती की, त्यांनाही नृत्ये मोठ्या देवाने शिकवली आदिवासी लोकवाङमयात याला अनेक आधार सापडतात.

  वारली आदिवासी जमातींची संस्कृतीमध्ये विविध सण-उत्सव, लोकनृत्य, लोकगीत यांचा समावेश दिसून येतो.सण-उत्सवाचा संबंध धर्माशी येतो. धर्म हा श्रद्धा प्रणाली किंवा सांस्कृतिक प्रणालींचा संग्रह आहे.[७] जो

मानवतेला अध्यात्माशी आणि नैतिक, विधी, प्रवचन, त्याग, अंत्यसंस्कार, प्रार्थना, संग्रीत, डान्स यांच्याशी जोडतो.

- **कामडनाच :** नारदेवाचा संबंध धान्य, पिके यांच्या समृद्धीशी आहे. भाद्रपद महिन्यात नवे तयार झालेले भात खाण्यापूर्वी ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी नारनदेवाची पूजा करतात. आदिवासींच्या प्रत्येक सण-उत्सवात नृत्याला मुख्य असे स्थान आहे. आदिवासी समूह हा देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी नृत्य करतात.

हा नाच रोपणीनंतर केळीची भाजी खाल्ली की सुरू होतो व नवे भाताचे पीक आले की थांबतो.यानाचाची सुरूवात करताना प्रथम नारनदेवाचे नाव घेऊन नाचास सुरूवात केली जाते. पुरूष पायात धातूऱ्या बांधून नारनदेवाची गाणी गाऊन, फेर धरून व टाळ्या वाजवून हा नाच करतात. स्त्रिया एका बाजूला बसून गाणे गाण्यास त्यांना साथ देतात. तरूण-तरूणी हा नाच ठिकाण व दिवस अगोदर ठरवून एकत्रित येऊन नाच करतात. पाऊस संपल्यानंतर देखील हा नाच केला जातो.

- **कामड नाचाची गाणी :**

(१)

नारन देवा तुझा वेडार। नाचूं दे बापडा।
वेडा नाचर वेडा सदा। गहला नाच गहला सदा।
नहरम देवा तुझे वेडार। नाचूं दे बापडा।
वेडा नाचर वेडा सदा। नाच गहला नाच सदा॥
(गहला — गबाळ, बापडा — बिचारा)

(अर्थ — कणसरी (लक्ष्मी) चा राग घालविण्यासाठी नारनदेव व बहरमदेव वेड्याचे सोंग करून तिच्यापुढे नाचू लागतात. (गाणारे लोक म्हणतात) हे नारनदेवाचे वेड, वेडं वाकड नाचत असून ते बिचारे नाचू दे ही बहरम देवाचे वेडसुद्धा वेडवाकड नाचत असून तेही बिचारे नाचू दे.)

(२)

अथ नाचूला कोठरं नाचू। धरतरेच्या पाठीवर।
धरतरी माझी मायुंर। तिला मी पाय कसा लावूरं
अथ नाचूला कोठरं नाचू। गावतरेच्या पाठीवर।
गावातरी माझी मायुंर। तिला मी पाय कसा लावूं र।
अथ नाचू का कोठरं नाचू। कनसरीच्या माल्यावर।
कनसरी माझी मायुंर। तिला मी पायकसा लावूं र॥
(धरतरा — पृथ्वी, अथ — इथे, मायु — पृथ्वी, गावतरा — गाई, कानसरी — लक्ष्मी)

(अर्थ — कामड नाचास सुरूवात करताना नाचणारा स्वत:ला प्रश्न विचारतो की मी आता कोठे नाचू? त्यावर उत्तर येते की, पृथ्वीच्या (धरतरी पाठीवर नाच. त्यावर नाचणारा म्हणतो की पृथ्वी ही माझी आई आहे. तिच्या पाठीवर पाय कसा ठेवू? त्याचप्रमाणे गाय (गावतरा) ही माझी आई आहे, तिच्या पाठीवर पाय कसा ठेवू ? त्याचप्रमाणे कणसरी (लक्ष्मी) माझी आई आहे, तिला मी पायकसा लावू?)[८]

नारनदेवाच्या कामड नाचाचा आणखी एक प्रकार आहे. पुरूष पानाफुलांनी शरीरे शृंगारून काही विशिष्ट सोंगे घेतात व त्यांना दुसरे पुरूष प्रश्न विचारतात या प्रश्नोत्तरांतूनच नाचाचा फेर धरून कामडनाच केला जातो.

अशाप्रकारे आदिवासी जमातीत विविध सण-उत्सव, लोकनृत्य, लोकगीते एकत्रितरित्या मोठ्या उत्साहात साजरी केली जातात, या संमिश्र भारतातील संस्कृतीचे मौल जाणून तिचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे.

## ➢ तळटिपा :

१) नाडगोंडे गुरूनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पृष्ठक्र. ३
२) डॉ. गारे गोविंद - सह्याद्रीच्या दऱ्याखोयातील ठाकूर (ठाकर) आदिवासी, श्री विद्या प्रकाशन, पुणे पृष्ठक्र. ४
३) डॉ.खैरनार दिलिप - समाजशास्त्र परिचय, डायमंड प्रकाशन, पुणे पृष्ठक्र. ४८
४) कित्ता पृष्ठक्र. २२०
५) प्रा.डॉ.पाटील व प्रा.डॉ.पगारे - सातपुड्यातील आदिवासी लोकसंस्कृती प्रकाशक, राहूल वाघ, पृष्ठक्र. ८१
६) डॉ.कुलकर्णी शौनक - महाराष्ट्रातील आदिवासी डायमंड प्रकाशन, पुणे पृष्ठक्र. ४९
७) Rajendra Prasad N.L. - Scheduled Cast and Tribe Challenges in India current publication, Agra Road Pg. No. १२९.
८) डॉ.गारे गोविंद – वारली चित्रसंस्कृती, विद्या प्रकाशन, पुणे पृष्ठक्र. १४

## संदर्भ :

१) डॉ.गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती, समस्या व विकास
२) डॉ.आकरे बी.एन. - आदिवासींची ओळख
३) डॉ.कवठेकर किरणकुमार - आदिवासी लोकनृत्ये, संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये
४) डॉ.देशमुख शिवाजीराव - आदिवासी ठाकरांचे लोकजीवन
५) Sunita P. Chaudhari - Introduction to Tribal Life